# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक - १५२
## सभावृत्तांत
## (दि.२.२.२०१० ची तहकूब सभा)

दिनांक- ०५.०२.२०१० वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.२.२.२०१०ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक ०५.०२.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती - सभापती
२. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ
३. मा.साळुंखे सुरेखा मारुती
४. मा.पिल्ले राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी
५. मा.नितीन उर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
६. मा.कदम निर्मला सद्‌गुरु
७. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
८. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे
९. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
१०. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
११. मा.सौ.सुलोचना बबन बढे

याशिवाय मा.आशिष शर्मा-आयुक्त,मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.देशमुख, मा.गायकवाड,मा.गावडे,मा.गायकवाड,मा.भोसेकर,मा.फडणीस-सहा.आयुक्त, मा.राजदेरकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चाकणकर-प्र.नगरसचिव,मा.उगिले-शहर अभियंता,मा.चव्हाण-अति.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.तुपे-सह शहर अभियंता,मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्य. अधिकारी,मा.लोंढे-मुख्यलेखापाल, मा.कुदळे,मा.जाधव,मा.सवणे,मा.दुधेकर-कार्य.अभियंता,मा.फुगे - मुख्य आयातकर अधिक्षक, मा.जाधव - शिक्षणाधिकारी, मा.पोमण-संगणक अधिकारी,मा.सुर्यवंशी - कायदा सल्लागार,मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

ठराव क्रमांक- १०५२४ विषय क्रमांक :- ४३
दिनांक- ०५.२.२०१० विभाग- माध्यमिक
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.सुरेखा साळुंखे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/१/कावि/११७/१० दि.२७/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

श्री.देशमुख डी.पी.-क्रीडा मार्गदर्शक, श्री.करवंदे ए.के. क्रीडा मार्गदर्शक, यांना दि.३/३/२०१० पासून पुढील ६ महिने कालावधी साठी र.रू.५,०००/- [र.रू.पाच हजार] एकत्रित मानधनावर मुदतवाढ देणेस व त्यांच्या मानधनापोटी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५२५ विषय क्रमांक :- ४४
दिनांक- ०५.२.२०१० विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/१०/कावि/४७/१० दि.२७/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

ई-नि.सु.क्र.५/०९-१० मधील गणवेश कापड बाब क्र.१३ ते १६ लघुत्तम निविदाधारक मे.महालक्ष्मी ट्रेडर्स, वाकड यांचेकडून खरेदी करणेस एकूण र.रू.५,४९,६०५/- एवढा खर्च येणार असल्याने मनपा गणवेश देय कर्मचाऱ्यांसाठी गणवेश कापड खरेदी कामी मे.महालक्ष्मी ट्रेडर्स, वाकड यांचेबरोबर करारनामा करण्यास व येणाऱ्या एकूण र.रू.५,४९,६०५/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५२६ विषय क्रमांक :- ४५
दिनांक- ०५.२.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/५३/१० दि.२७/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.९/२००९-१० मधील अ.क्र.१२ अन्वये, वॉर्ड क्र.३३ खराळवाडी मधील पापय्या चाळी मधील जुने संडास ब्लॉक पाडून नविन दुमजली संडास ब्लॉक बांधणेकामी मे.अशपाक सत्तार शेख (नि.र.रू.२३,३२,०००/- [र.रू.तेवीस लाख बत्तीस हजार] पेक्षा १०.६५ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२०,८३,६४२/- [र.रू. वीस लाख त्र्याऐंशी हजार सहाशे बेचाळीस] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची

रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५२७ विषय क्रमांक :- ४६
दिनांक- ०५.२.२०१० विभाग- क प्रभाग
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.कप्र/लेखा/नि.क/१५/कावि/२६/१०दि.२०/१/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९-१० मधील अ.क्र.३ अन्वये, भोसरी विभागातील वॉर्ड क्र. १०, १४, १५ परिसरातील पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्ती व देखभालीची कामे करणेकामी मे.पी.जी.कन्स्ट्रक्शन (नि.र.रू. ९,२२,५४५/- [र.रू.नऊ लाख बावीस हजार पाचशे पंचेचाळीस] पेक्षा ३० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५२८ विषय क्रमांक :- ४७
दिनांक- ०५.२.२०१० विभाग-क प्रभाग
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.कप्र/लेखा/नि.क/१५/कावि/२४/२०१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९-१० मधील अ.क्र.४ अन्वये, वॉर्ड क्र.१६, १७, १८, १९ मध्ये पाणीपुरवठा व इतर दुरुस्तीची कामे करणेकामी मे.पी.जी. कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.९,२२,५४५/- [र.रू.नऊ लाख बावीस हजार पाचशे पंचेचाळीस] पेक्षा ३० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५२९ विषय क्रमांक :- ४८
दिनांक- ०५.२.२०१० विभाग- क प्रभाग
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.सुरेखा साळुंखे
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.कप्र/लेखा/नि.क/कावि/२२/१०दि.२०/१/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.२१ अन्वये, वॉर्ड क्र.२७ आण्णासाहेब मगर स्टेडीयम मधील गणेशनगर परिसरात कॉक्रीट पेव्हींग ब्लॉक बसविणे व स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.व्यंकटेश

कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४,६५,९००/- [र.रू.चार लाख पासष्ठ हजार नऊशे] पेक्षा ३५.१० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५३० विषय क्रमांक :- ४९

दिनांक- ०५.२.२०१० विभाग-विद्युत

सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ

संदर्भ- मा.सहशहर अभियंता यांचे जा.क्र.विद्युत/नि/१अ/कावि/२०/१० दि.२७/१/२०१०

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.११/०९-१० मधील अ.क्र.२ अन्वये, विजेची बचत हीच विजेची निर्मिती या अभियानांतर्गत स्टिकर्स, वॉटरप्रुफ बोर्ड इ.साहित्याचा वापर करून जानजगृती करणेकामी मे.ओम एंटरप्रायझेस (नि.र.रू. २,४१,०१०/- [र.रू.दोन लाख एक्केचाळीस हजार दहा] पेक्षा ४.५०% जास्त) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५३१ विषय क्रमांक :- ५०

दिनांक- ०५.२.२०१० विभाग-निवडणूक

सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पोट.निव./कावि/८७/१० दि.२५/१/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मे.आकाश फोटो स्टुडीओ, पिंपरी यांचेकडून प्रभाग क्र.८६ थेरगांव गणेशनगर पोटनिवडणूक २००९ साठी आचारसंहितेचे पालन होण्यासाठी व निवडणूक प्रक्रियेत गैर प्रकारास प्रतिबंध होण्यासाठी व्हिडीओ चित्रीकरण करून त्याच्या सी.डी. पुरविणे बाबतचे काम दि.१२/१२/२००९ ते २१/१२/२००९ या कालावधीत प्रती दिन प्रति कॅमेरा र.रू.१०००/- व प्रती सी.डी. र.रू.१००/- या दराने करून घेण्यात आले असल्याने त्यास व त्याकामी येणारा प्रत्यक्ष खर्च र.रू.२३,१००/- [र.रू.तेवीस हजार शंभर] अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५३२ विषय क्रमांक :- ५१

दिनांक- ०५.२.२०१० विभाग- कायदा

सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.कास/३/कावि/६६/१० दि.२७/१/२०१०

विषय - दरखास्त क्र.१७३/२००९ प्रकरणी रक्कम अदा केलेबाबत...

विषय क्रमांक ५१चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५३३ विषय क्रमांक :- ५२
दिनांक- ०५.२.२०१० विभाग-क प्रभाग विद्युत
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.कप्र/वि/५७/१० दि.२५/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

गणेश विसर्जन मार्गावर व विसर्जनाच्या ठिकाणी स्पिकर, विद्युत, प्रकाश व्यवस्था करणे या कामाचा खर्च र.रू.८९,८००/- च्या ५.७% कमी या दराने करारनामा न करता मे.त्रिमुर्ती मंडप स्पिकर ॲन्ड इलेक्ट्रीकल्स, निगडी यांस र.रू.८१,८५२/- [र.रू. एक्याऐंशी हजार आठशे बावन्न] अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५३४ विषय क्रमांक :- ५३
दिनांक- ०५.२.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/९/५/१० दि.२८/१/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९/१० मधील अ.क्र.४ अन्वये, ब प्रभागांतर्गत तालेरा व जिजामाता हॉस्पीटल येथील वातानुकुलन यंत्रणेची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.विमलाई इलेक्ट्रिक कार्पो. (नि.र.रू.१,४९,९९५/- [र.रू.एक लाख एकोणपन्नास हजार नऊशे पंच्यान्नव] पेक्षा १५.७५ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५३५ विषय क्रमांक :- ५४
दिनांक- ०५.२.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/९/२/१० दि.२८/१/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९/१० मधील अ.क्र.६ अन्वये, ब प्रभागांतर्गत प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील अग्निशमन यंत्रणेची दुरुस्ती करणेकामी मे.विमलाई इलेक्ट्रिक कार्पो. (नि.र.रू.३,७४,९५४/- [र.रू.तीन लाख चौऱ्याहत्तर हजार नऊशे चोपन्न] पेक्षा १.२५ % कमी) या सर्वात कमी दराचे

ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५३६ विषय क्रमांक :- ५५
दिनांक- ०५.२.२०१० विभाग-दूरसंचार
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दूरसंचार/२९/१० दि.२८/१/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

श्री.कारचे, सहा.आयुक्त (झोनिपू) यांस ब्लॅकबेरी मॉडेल ८५२० कर्व या प्रकारचा मोबाईल मे.आयडीया कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.प्राईम इंटरप्रायझेस यांचेकडून थेट पध्दतीने करारनामा न करता व निविदा न मागविता प्रति नग र.रू.१५,९९०/- प्रमाणे खरेदी करणेस तसेच मोबाईल वापराची अधिकतम मर्यादा र.रू. २,०००/- प्रति माह प्रमाणे कायम ठेवून ब्लॅकबेरी सुविधा पुरविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५३७ विषय क्रमांक :- ५६
दिनांक- ०५.२.२०१० विभाग-संगणक
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.संगणक/५/कावि/७/१० दि.२५/१/२०१०
विषय- National Mission Mode Project for E-Governance in Municipalities या प्रकल्पांतर्गत संगणकीकरण बाबतचे कामकाज M/s. Probity Soft Pvt. Ltd., Pune यांचेमार्फत करणेबाबत...

विषय क्रमांक ५६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०५३८ विषय क्रमांक :- ५७
दिनांक- ०५.२.२०१० विभाग- संगणक
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.संगणक/२/कावि/१४/१० दि.२८/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मे.मोनार्च टेक्नॉलॉजी प्रा.लि., पुणे यांचे मार्फत संगणक यंत्रणा देखभाल व दुरुस्ती एक वर्षाचे कामकाज करून घेण्यास कामकाजाचा करारनामा करणेस व येणाऱ्या वार्षिक र.रू.३८,९५,१३०/- [र.रू.अडोतीस लाख पंच्यान्नव हजार एकशे तीस] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक :- मा.प्रशांत शितोळे                    अनुमोदक :- मा.भाऊसाहेब सुपे

नगरसचिव कार्यालयातील ज्ञानोबा लक्ष्मण लांडगे-शिपाई तथा मा.महापौर यांचे चोपदार यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

------------

(उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.)

--------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/९/कावि/२२४/२०१०
दिनांक - ०६/०२/२०१० चे लगत

सही/-
प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.